# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    डि.सी.आर.    दिनांक  २७/०७/२०१८**

नांदेड, जिल्हयातील ता.मुदखेड मौजे आमदुरा येथे आज दिनांक २७.०७.२०१८ रोजी सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतिने मराठा आरक्षण मागणीसाठी जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्या अनुषंगाने खबरदारी म्हणुन मोठया प्रमाणात पोलीस बंदोबस्त अपर पोलीस अधिक्षक भोकर, यांच्या देखरेखी खाली लावण्यात आला होता. सदर  उपविभागीय दंडाधिकारी ,भोकर ,तहसिदार मुदखेड उपविभागीय पोलीस अधिकारी भोकर हजर होते, सदर ठिकाणी पोलीस अधिक्षक , नांदेड श्री चंद्रकिशोर मीणा हे स्वतः ही हजर होते .आंदोलनकर्ते प्रक्षुब्ध होऊन गोदावरीमध्ये जलसमाधी घेण्यासाठी हट्ट धरुन प्रक्षोभक घोषणा बाजी करत होते त्यावेळी खबरदारी म्हणुन पोलीस अधिक्षक श्री चंद्रकिशोर मीणा यांनी प्रक्षोभक जमावास /आंदोलन कर्ते यांना आंदोलन शांततेत करावे.कोणतेही हिंसक वळण देवुन बेकायदेशीर कृत्य करु नये असे वारवांर सुचवित होते. परंतू आंदोलन कर्त्यानी दिलेल्या सुचनांकडे लक्ष न देता प्रक्षोभक होऊन बंदोबस्तासाठी उपस्थित पोलीसांच्या दिशेने आक्रमक होऊन ४०० ते ५०० आंदोलकांनी पोलीसांनवर तुफान दगडफेक सुरु केली व पोलीस विभागाच्या व महसुल विभागाच्या वाहनाची तोडफोड करणे सुरु केले. प्रक्षोभक झालेला जमाव अधिकच हिंसक होऊन  शासकीय व खाजगी मालमतेचे नुकसान करीत होते. त्यामध्ये जमावाला आटोक्यात आणण्यासाठी प्रथम अश्रुधुराच्या नळकांडया फोडून व प्लास्टीक बुलेट चा वापर करुन आक्रमक जमावाला पांगवण्याचा प्रयत्न करण्यात आला. सदर हिंसक आंदोलन कर्त्यांच्या दगडफेकीमध्ये पोलीस दलाचे एकुण ०४ शासकीय वाहने व उपविभागीय दंडाधिकारी,भोकर यांचे ०१ शासकीय वाहनाचे नुकसान केले व बंदोबस्त करीता नेमलेले पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी असे २५ ते ३० जखमी झाले आहे. तेंव्हा हिंसक/आक्रमक जमावाला पांगवण्यासाठी बळाचा वापर करुन लाठी चार्ज करुन परिस्थीतीवर नियंत्रण मिळवले. सद्या परिस्थीती शांततेत आहे.तसेच पुन्हा पुन्हा सकल मराठा  क्रांती मोर्चा,समन्वयक सदस्य व जनतेला आव्हान करण्यात येते की,मोर्चे ,आंदोलने शांततेत पारपाडावे कायदा व सुव्यवस्था हातात घेवु नये. व कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता शांतता राखावी.

**(अे.जी.खान)**
**पोलीस उपअधीक्षक,नांदेड(गृह)**